कार्यालय :- महानगरपालिका अमरावती
जा. क्र. अमनपा/ससंनर/अभि/ ४८ /२०१७
दि. :- १९ /०१ /२०१७

प्रति,

श्री. बलदेव ओमप्रकाश मंधान
अमरावती

विषय :- मौजा-बडनेरा ता.जि. अमरावती येथील शेत स.नं. १३/१क मधील क्षेत्र ०.५७ हे. आर. अभिन्यास नकाशास तात्पुरती तांत्रिक मंजूरी देणे बाबत.

संदर्भ :- आपला दिनांक २०/१२/२०१७ चा अर्ज.

आपल्या उपरोक्त संदर्भीय अर्जा सोबत सादर केलेले कागद पत्रे तसेच प्रस्तावित अभिन्यास नकाशाच्या छानणी अंती नियोजनाच्या माध्यमातुन तांत्रिक दृष्टिने सर्वसाधारण पणे योग्य आढलुन आल्याने खालील अटींवर तात्पुरती तांत्रिक मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

१) मंजूर अभिन्यासा प्रमाणे तालुका निरीक्षक, भुमि अभिलेख, यांचे कडुन प्रत्यक्ष जागेवर आखणी करावी, आखणी करीत असतांना सभोवताल मंजूर अभिन्यासातील रस्त्याशी / नाल्याशी योग्य रित्या समन्वय साधणे आवश्यक राहील. आखणी नंतर काही फरक आढळल्यास जागेवरील आखणी केल्याप्रमाणे तालुका निरिक्षक, भुमि अभिलेख, अम. यांनी प्रमाणित केलेला मुळ मोजणी नकाशा व त्याआधारे तयार केलेले सिमांकित अभिन्यास नकाशे तयार करुन या कार्यालयाकडे सादर करावे लागतील.

२) अभिन्यासाची जागेवर प्रत्यक्ष आखणी करतांना / केल्या नंतर सार्वजनिक उपयोगा करीता राखून ठेवलेल्या खुल्या जागेचे क्षेत्रफळ अभिन्यासाखालील जागेच्या १०% पेक्षा कमी नसावे.

३) विषयांकित जागेत काही वृक्ष असल्यास आखणीचे वेळी ती नष्ट न करता विद्यमान स्थितीत कायम ठेवावीत.

४) सिमांकित नकाशावर ड्रेनेजचे रेखांकन व छेद नकाशे दर्शविण्यात यावेत.

५) रस्त्याचा छेद नकाशात मंजूरी घेवूनच त्या नुसार खडीकरणाचे व सी. डी. वर्क इ. कामेपुर्ण करावे.

६) सिमांकित नकाशे १.५०० च्या प्रमाणात असावे.

७) भुखंडाची उपविभागणी महानगर पालिकेच्या पुर्व परवानगी शिवाय करता येणार नाही.

८) प्राथमिक विकासाची कामे खालील तीन पर्याय पैकी एका पर्याया नुसार करणे आवश्यक आहे.

अ) अभिन्यासातील भूखंडाचे निव्वळ क्षेत्रफळाचे १०% जमिन म.न.पा. कडे खरेदी करुन हस्तांतरीत करुन द्यावी लागेल.

ब) प्राथमिक विकासाकरीता येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रकास शहर अभियंता मनपा, अम यांनी मंजूरी दिल्याप्रमाणे परीगणित होणारे एकुण शुल्क मनपा कडे अर्जदारांनी जमा करावे.

क) मा. आयुक्त यांच्या दि. २३/०४/०४ रोजीच्या आदेशानुसार, प्राथमिक विकासाची कामे स्वखर्चाने करावयाची असल्यास म.न.पा. कडुन रस्ते, नाली इत्यादी बाबतीत म.न.पा. चे नियमानुसार क्रॉस सेक्शन्सह रितसर मंजुरी घेवूनच करावी लागेल.

९) मा. आयुक्त यांच्या दि. १७.१२.२०१५ रोजीच्या आदेशानुसार खालील बाबींची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

अ) रस्त्यालगत LED स्ट्रीट लाइट पोल ५०.०० मी. अंतरावर देण्यात यावे.

ब) अभिन्यासास अंतीम मंजुरात मिळाल्याशिवाय तथा अकृषक झाल्याशिवाय भुखंडाची विक्री करता येणार नाही.

वरील बाबी चे नकाशे, साईझ (Size), इत्यादी व आवश्यक तेथे अंदाजपत्रक प्रथम मनपा कडुन मंजुर करण्यात यावे. व अभिन्यासाचे क्षेत्रफळानुसार प्रति हेक्टरी २५ प्रमाणे झाडे लावून ट्री गार्ड लावावे.

वरील सर्व प्राथमिक विकासाची कामे सक्षम अधिका-याकडुन तपासणी करुन त्यांचे समाधान झाल्यावर आपल्या सिमांकीत अभिन्यास नकाशाला अंतीम मंजूरी प्रदान करण्यात येईल. तसेच सदर कामे केल्याशिवाय कोणत्याही भुखंडावर बांधकाम परवानगी महानगर पालिके तर्फे देण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

(मा. आयुक्त, यांचे दि. २९/१२/२०१७ चे आदेशान्वये)

सहपत्र - मंजूर नकाशाची प्रत

सहाय्यक संचालक नगर रचना
महानगरपालिका, अमरावती.

प्रतिलिपी -

१. मा. उपसंचालक नगर रचना वि.यो.वि.घ. अमरावती
२ . तालुका निरिक्षक, भुमि अभिलेख, अमरावती
३. शहर अभियंता, मनपा, अमरावती.
यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता.

सहाय्यक संचालक नगर रचना
महानगरपालिका, अमरावती.

